# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत )

"उद्योग सारथी", मरोळ औद्योगिक क्षेत्र, महाकाली गुंफा मार्ग, अंधेरी (पूर्व), मुंबई-९३

क्र.मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/B53702 दिनांक : 3/7/2020

## परिपत्रक

**विषय : कंपनीच्या भागभांडवलामध्ये Securities & Exchange Board Of India(Real Estate Investment Trust) नियमानुसार होणा-या बदलाबाबत**

**संदर्भ : १. परिपत्रक क्र.मऔविम/का.२/विधी व कामकाज/११ दि.१७.०४.२००७**
**२. परिपत्रक क्र. मऔविम/भूविभाग/म.व्य.(भूमी)/ए ८८८२० दि. १५.०३.२०१८**

महामंडळाच्या संचालक मंडळाच्या दि. २८.०१.२०२० च्या बैठकीतील ठराव क्र. ६०५२ अन्वये झालेल्या निर्णयानुसार कंपनीच्या भागभांडवलामध्ये Securities & Exchange Board of India(Real Estate Investment Trust) नियमानुसार होणा-या बदलाकरीता महामंडळाच्या संदर्भिय परिपत्रकानुसार Real Estate Investment Trust चा हस्तांतर मार्गदर्शक तत्वामध्ये समावेश करण्यात येत आहे. संदर्भिय परिपत्रकानुसार निर्गमित केलेले धोरण Real Estate Investment Trust ला लागू राहील. तथापि, सदर प्रकरणी भूखंडाचे Trading चे माध्यम होणार नाही तसेच मूळ भूखंडधारकाचे भागभांडवल ५१ टक्के पेक्षा जास्त(मूळ भूखंडधारकाचा मालकी हक्क अबाधीत ठेवणे) कायम ठेवणे बंधनकारक राहील.

वरील प्रमाणेच्या धोरणाची अंमलबजावणी करतेवेळी महामंडळाने वाटप केलेल्या भूखंडांचे कुठल्याही प्रकारे Trading होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी. सदर धोरण हे मऔवि अधिनियम-१९६१ आणि त्यांचे नियम व विनियम याच्या अधीन आणि अनुसरुन लागू करण्यात येतील. तसेच सदर धोरणाबाबत स्पष्टता आणण्यासाठी महामंडळाव्दारे आवश्यकतेनुसार मार्गदर्शक तत्वे निर्गमित करण्यात येतील.

सदर धोरणाची अंमलबजावणी करतेवेळी जर भूखंडधारक भूखंडाचे Trading करतांना आढळल्यास किंवा सदर धोरणाची अंमलबजावणी करतेवेळी महामंडळास वित्तीय नुकसान होत असल्यास किंवा महामंडळाच्या प्रचलित वाटपाच्या /हस्तांतराच्या धोरणास किंवा महामंडळाच्या

भूखंडावरील कायदेशीर अधिकारास बाधा येत असल्यास, अशा परिस्थितीत महामंडळास भूखंडाचा ताबा परत घेणे, लीजचा करारनामा रद्द करणे आणि सदर धोरण रद्द करण्याचे संपूर्ण अधिकार राहतील.

सदरहू परिपत्रक मा. मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

(अविनाश सुभेदार)
**सह मुख्य कार्यकारी अधिकारी(प्रशासन)**
**मऔविम, मुंबई.**

प्रति,

१. सर्व विभाग प्रमुख, मऔविम, मुंबई.
२. अतिरिक्त मुख्य अभियंता, मऔविम, पुणे/नांदेड/नागपूर.
३. सर्व अधिक्षक अभियंता, मऔविम.
४. सर्व प्रादेशिक अधिकारी, मऔविम.
५. सर्व कार्यकारी अभियंता, मऔविम.
६. सह मुख्य/उप मुख्य लेखा अधिकारी, मऔविम, मुंबई/पुणे /औरंगाबाद/नागपूर.
७. महाव्यवस्थापक (भूमि)/महाव्यवस्थापक (भूसंपादन)/व्यवस्थापक (भूमि-१/२), मऔविम, मुंबई.
८. प्रशासकीय अधिकारी, मऔविम, मुंबई.
९. व्यवस्थापक (भूसंपादन-१/२), मऔविम, मुंबई.
१०. जनसंपर्क अधिकारी, मऔविम, मुंबई.
११. सर्व क्षेत्र व्यवस्थापक, मऔविम.
१२. म.औ.वि. महामंडळाचे सर्व संचालक.
१३. सर्व महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र.
१४. सर्व औद्योगिक संघटना.
१५. मुख्य मध्यवर्ती परिपत्रक नस्ती/मुख्य कार्यकारी अधिकारी, मऔविम, कार्यालय मरोळ/जागतिक व्यापार केंद्र (डब्ल्यू.टी.सी.), कफ परेड, मुंबई